# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०५ एप्रिल २०१८.

**विविध महानगरपालिकांमधील**
**६ रिक्तपदासांठी आज मतदान**
**'बृहन्मुंबई'च्या एका जागेचा समावेश**

मुंबई, दि. ५: बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सहा महानगरपालिकांमधील प्रत्येकी एका जागेच्या पोटनिवडणुकीसाठी उद्या (ता. ६) मतदान होत असून ७ एप्रिल २०१८ रोजी मतमोजणी होईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, बृहन्मुंबई, नाशिक, सोलापूर, पुणे, अहमदनगर व उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रत्येकी एका रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीसाठी उद्या (ता.६) सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी ७ एप्रिल २०१८ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

**महानगरपालिकानिहाय पोटनिवडणूक होत असलेल्या प्रभागाचे नाव व उमेदवारांची संख्या: बृहन्मुंबई** (१७३)- ३, **नाशिक** (१३-क)- ८ **सोलापूर** (१४-क)- ९, **पुणे-** (२२-क) ५, **अहमदनगर-** (३२-ब)- ३ आणि **उल्हासनगर** (१७-ब)- ४.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)